RNI No. MAHBIL/2012/48433

www.dgps.maharashtra.gov.in.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक – पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १४, अंक - ०५ ] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ३० ते फेब्रुवारी ५, २०२५ / माघ १० - १६, शके १९४६ [ पृष्ठे-१८५

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**नगर विकास विभाग**

**चौथा मजला, मुख्य इमारत,**
**मंत्रालय, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक : २१ जानेवारी २०२५**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९९६*

**अधिसूचना**

क्रमांक टीपीएस-१८२३/६४३/प्र.क्र.८७/२०२३/नवि-१३.—ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) चे कलम ३१ *(१)* अन्वये, जेजुरी नगरपरिषदेची (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे उल्लेखिलेला) द्वितीय सुधारित विकास योजना अधिसूचना क्रमांक टीपीएस-१८१८/७६६/प्र.क्र.१८५/१८/वि.यो.मंजुरी/नवि-१३, दिनांक २७ जुलै २०१८ अन्वये भागश: मंजूर झालेली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" आणि "उक्त अधिसूचना" म्हणून उल्लेखिलेल्या) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील नियोजनानुसार, जेजुरी येथील जुना गट नंबर १८१/१, नवीन गट नंबर १०८/१ (पै.) क्षेत्रावर आरक्षण क्र. २२, "व्यापारी संकुल" व "बेलदार समाज धर्मशाळा" करिता निर्देशन दर्शविलेले असून (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाकरिता जेजुरी नगरपरिषद नियोजन प्राधिकरण आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या ठराव क्र. ३४, दिनांक १४ सप्टेंबर २०२२ अन्वये, उक्त विकास योजनेत फेरबदल करून, उक्त जागेवरील "शॉपिंग सेंटर" चे आरक्षणाखालील २००० चौ.मी. क्षेत्रापैकी ९९० चौ.मी. क्षेत्र वगळून तेथे "बेलदार समाज धर्मशाळा" आरक्षण दर्शविणे, तसेच नगरपरिषद मालकीच्या जागेवरील "बेलदार समाज धर्मशाळा" निर्देशन वगळून रहिवास क्षेत्रात समाविष्ट करण्याचे ठरवून, उक्त अधिनियमाचे कलम ३७*(१)* अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. (यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव" असे संबोधिले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, शासनाने आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त फेरबदलाचा प्रस्ताव, काही अटींसह, मंजूर करणे योग्य होईल, असे शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, रहिवास विभागात समाविष्ट करावयाच्या जमिनींच्या मालकांनी बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणाऱ्या उक्त जमिनीच्या एकूण रकमेच्या ५ टक्के दराने येणाऱ्या अधिमूल्य रकमेपैकी शासनास देय असलेली अधिमूल्याची ५० टक्के रक्कम सहायक संचालक, नगर रचना, बारामती शाखा, बारामती यांच्या लेखाशीर्षामध्ये जमा केलेली आहे आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५० टक्के अधिमूल्याची रक्कम मुख्याधिकारी, जेजुरी नगरपरिषद यांच्या लेखाशीर्षामध्ये जमा केलेली आहे ;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ पोट-कलम *(२)* अन्वये व त्या अनुषंगाने प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्तावास, काही अटींसह, शासन मंजुरी देत आहे. उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसूचनांच्या फेरबदल सूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**"नोंद"**

"जेजुरी जुना गट नंबर १८१/१, नवीन गट नंबर १०८/१ (पै.) येथील आरक्षण क्र. २२ "व्यापारी संकुल" चे आरक्षणाखालील २००० चौ.मी. क्षेत्रापैकी ९९० चौ.मी. क्षेत्र वगळून तेथे "बेलदार समाज धर्मशाळा" आरक्षण दर्शविणे व बेलदार समाजकरिताचे निर्देशन वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे."

**अटी :--** प्रस्तुत फेरबदलाखालील जागेचे मोजणी नकाशानुसार स्थान व विकास योजना नकाशातील स्थान यामधील विसंगती दूर करण्यासाठी सुधारित मोजणी नकाशा संबंधितांकडून घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

(१) सदर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा क्रमांक टीपीएस-१८२३/६४३/प्र.क्र.८७/२०२३/नवि-१३ जनतेच्या अवलोकनार्थ मुख्याधिकारी, जेजुरी नगरपरिषद, जेजुरी यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध असेल.

(२) सदर अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,*

**प्रणव कर्पे,**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

---

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**
**Mantralaya, Mumbai - 400 032.**

dated : 21st January 2025

*The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

**NOTIFICATION**

No. TPS-1823/643/C.R.-87/2023/UD-13.– Whereas, the Urban Development Department of the Government, under Section 31*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. 37 of 1966) (hereinafter referred to as the “said Act”), has partially sanctioned the second revised Development Plan of the Jejuri Municipal Council (hereinafter referred to as the “said Planning Authority”) *vide* Notification No. TPS-1818/766/CR.185/18/D.P. Sanction/UD-13, dated 27th July 2018 (hereinafter referred to as the “said Development Plan” and the “said Notification”) ;

and whereas, as per the said Development Plan, Reservation No. 22, “Commercial Complex” and nomenclature for the Beldar Community Dharmashala is shown on the land having Old Plot No. 181/1 and New Plot No. 108/1 in Jejuri (hereinafter referred to as “the said reservation”). The Jejuri Municipal Council is the Planning Authority for the said reservation ;

and whereas, the said Planning Authority, through Resolution No. 34, dated 14th September 2022, has decided to modify the said Development Plan to exclude an area of 990 sq.mtrs. from 2000 sq.mtrs. area reserved for a “Shopping Center” on the said land and designating it as a reservation for “Beldar Samaj Dharamshala,” also to remove the designation of “Beldar Samaj Dharamshala” on the land owned by the Municipal Council and include it in the residential zone. The said Planning Authority has completed all statutory procedures under Section 37*(1)* of the said Act, and submitted the amendment proposal for the approval of the Government (hereinafter referred to as “the said Modification Proposal”).

and whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of opinion that, the proposed Modification needs to be sanctioned with some condition ;

and whereas, the landowners of the land to be included in the residential zone have deposited 50 per cent of the premium amount payable to the Government, calculated at 5 per cent of the total market value of the said land as per the ASR, into the account of the Assistant Director, Town Planning, Baramati Branch, Baramati, and have deposited the remaining 50 pet cent of the premium amount payable to the Planning Authority into the account of the Chief Officer, Jejuri Municipal Council.

Now therefore, in accordance with sub-section *(2)* of Section 37 of the said Act, and by exercising of the associated powers conferred therein, the Government hereby approves the proposed modification, with some condition, to the said Development Plan. A new entry is being added after the last entry in the list of Modification sanctioning the said Development Plan.

**"ENTRY"**

"An area of 990 sq.mtrs. out of the 2,000 sq.mtrs. under Reservation No. 22 for the "Commercial Complex," at Old Plot No. 181/1 and New Plot No. 108/1 in Jejuri, is being deleted and reserved as "Beldar Community Dharamshala" and the nomenclature of "Beldar Community Dharamshala" is being removed and the land is included in the Residential Zone."

**Condition :** To resolve the discrepancies between the location of the proposed modification as per the measurement map and the development plan, a revised measurement map should be obtained from the concerned parties and necessary action should be taken accordingly.

(1) A copy of the part Plan No. TPS-1823/643/CR-87/2023/UD-13 showing the aforesaid sanctioned modification shall be available in the office of the Chief Officer, Jejuri Municipal Council, District Pune during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

(2) This Notification shall also be published on the Govt. website **www.maharashtra.gov.in** (Acts / Rules.)

*By Order and in the name of the Governor of Maharashtra,*

**PRANAV KARPE,**
Under Secretary to Government.

---

**जिल्हाधिकारी यांजकडून**

**जिल्हा सांगली**

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकता हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ (१) अन्वये*

**अधिसूचना**

क्रमांक भूसं./कावि-१९/एसआर-१/२०२४.— ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-विभाग ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिसूचना असा केला आहे") याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड ए)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, सांगली यांना यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते; ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत (विस्थापन होणार असेल तर अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे आणि ज्याअर्थी कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये, पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा).

त्याअर्थी, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चारखालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही (किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही).

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार जिल्हाधिकारी, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी, उपविभागीय अधिकारी, कडेगाव उपविभाग, कडेगाव यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**जिल्हा सांगली, तालुका पलूस, गाव पुणदी**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | एकूण क्षेत्र हे. आर | बाधित क्षेत्र (अंदाजे हे. आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | १०६८/ब | ४.०४ | ०.०७ |
| २ | ११००/ब | ०.४४ | ०.०८५ |
| ३ | ११०२ | ०.३७ | ०.०९५ |
| ४ | ११०३ | ०.१२ | ०.०३५ |
| ५ | ११०४ | ०.१४ | ०.०३५ |
| ६ | ११०५ | ०.४८ | ०.१३५ |
| ७ | ११०६ | ०.११ | ०.०३५ |
| ८ | ११०७ | ०.०९ | ०.०१५ |
| ९ | ११४० | ०.८ | ०.१७५ |
| १० | ११३९ | ०.२२ | ०.२२ |
| ११ | ११३८ | ०.१३ | ०.१३ |
| १२ | ११३७ | ०.१ | ०.०६५ |
| १३ | १०६८/क | ०.६१ | ०.०५ |
| १४ | १०६९ | ०.५९ | ०.०८ |
| १५ | १०७१ | ०.६ | ०.०४ |
| १६ | १०९६ | ०.१४ | ०.००५ |
| १७ | १०९७ | ०.१६ | ०.०१ |
| १८ | १०९८ | ०.०६ | ०.००५ |
| १९ | १०९९ | ०.३२ | ०.०५ |
| २० | ११००/अ | ०.१२ | ०.०२५ |
| २१ | ११०१ | ०.१४ | ०.०३ |
| | **एकूण** | **९. ७८** | **१.३९०** |

## अनुसूची - दोन

**प्रकल्पाचे नाव** : सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील उरुण, इस्लामपूर, नवे खेड, जुने खेड, पुणदी, किर्लोस्करवाडी, पलूस कॉलनी रस्ता, प्रजिमा क्र. ३६ कि.मी. १०/५०० ते १०/९०० मधील मोठ्या पुलाच्या पोहोच मार्गाचे बांधकाम करणे.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** : पुलाचे बांधकाम करणेकामी मौजे पुणदी येथील गट नं. १०६८/ब, ११००/ब, ११०२, ११०३, ११०४, ११०५, ११०६, ११०७, ११४०, ११३९, ११३८, ११३७, १०६८/क, १०६९, १०७१, १०९६, १०९७, १०९८, १०९९, ११००/अ, ११०१ मधील ९.७८ हे. आरपैकी १.३९० क्षेत्र.

**समाजाला होणारे लाभ** : वाहतूक व दळवळण व्यवस्था

## अनुसूची - तीन

### बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

प्रस्तावित संपादन क्षेत्रामध्ये फक्त शेतजमीन येत असून गावठाण, तसेच भूसंपादन क्षेत्रातील कोणाचेही विस्थापन होत नाही.

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

| गावाचे नाव | तालुका | जिल्हा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

निरंक

## अनुसूची - चार

### (सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला)
### सामाजिक प्रभाव निर्धारणचा सारांश

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक २८, मंगळवार, ३० जानेवारी २०२३, दिनांक ३१ जानेवारी २०२३ रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रानुसार सदरचा प्रकल्प ग्रामीण पायाभूत सुविधांतर्गत येत असल्याने त्यास भूसंपादन व पुनर्वसन पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट देण्यात आलेली आहे.

## अनुसूची - पाच

### नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

सदर भूसंपादनामुळे व्यक्तीचे / व्यक्तींचे विस्थापन होत नसलेमुळे पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रशासक नियुक्त करणेची आवश्यकता नाही.

**टीप :** उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी, कडेगाव उपविभाग, कडेगाव (मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तडसर रोड, कडेगाव) या कार्यालयात निरीक्षण करता येऊ शकेल.

**डॉ. राजा दयानिधी** (भा.प्र.से.),

सांगली, ९ सप्टेंबर २००२४. जिल्हाधिकारी, सांगली.

---

## उपजिल्हाधिकारी यांजकडून

**जिल्हा सातारा**

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.*

## अधिसूचना - कलम ११

क्रमांक भूसं-९/एसआर-७६८/२०२५.– ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय, अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड ऐ)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Establishment of underground Cable infrastructure (Optical Fiber Cable). | नुसार आवश्यक कागदपत्रे. ३. शासनाद्वारे वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक कागदपत्रे. | डिसेंबर २०२२ मधील Schedule IV नुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क. | ४२/ UD-२०, दि. १९ डिसेंबर २०२२ मधील तरतुदी-नुसार ६० दिवस. | | | राज्यस्तरीय दूरसंचार समिती. |
| ६४ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदी-नुसार वृक्षतोड परवानगी देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक कागदपत्रे. | स्थानिक स्तरावर विहित पद्धतीने मंजूर केलेले शुल्क | ४५ दिवस | संबंधित प्राधिकरणाचे वृक्ष अधिकारी | संबंधित नियोजन प्राधिकरणाचे मुख्याधिकारी | संबंधित नियोजन प्राधिकरणा-कडील वृक्ष प्राधिकरण |
| ६५ | रस्त्यावरील खड्डे बुजविणे. | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | स्थानिक स्तरावर विहित पद्धतीने मंजूर केलेले शुल्क | ५ दिवस | नगर अभियंता (स्थापत्य) | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६६ | गटारावरील झाकणे सुस्थितीत ठेवणे. | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | स्थानिक स्तरावर विहित पद्धतीने मंजूर केलेले शुल्क | ५ दिवस | पाणीपुरवठा, जलनिस्सारण व आरोग्य अभियंता. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६७ | शहरात स्वच्छता ठेवणे. | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | स्थानिक स्तरावर विहित पद्धतीने मंजूर केलेले शुल्क | १ दिवस | पाणीपुरवठा, जलनिस्सारण व आरोग्य अभियंता. | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**शंकर खंदारे,**

मुख्याधिकारी,

कराड, १६ जानेवारी २०२५. कराड नगरपरिषद, कराड.

---

## मेढा नगरपंचायत, मेढा

### अधिसूचना

क्रमांक मे.न.पं./३४२/२०२४-२५.— महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत राज्यातील खालील लोकसेवा या राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांनी अधिसूचित करणेबाबत नगर विकास विभाग-२ यांच्यामार्फत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार नगर विकास विभाग-२ यांचेद्वारे राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची यादी पुढीलप्रमाणे आहे.

परिशिष्ट

| अ.क्र. | अधिसूचित करण्यात आलेल्या सेवेचे नाव | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. वास्तव्याचा पुरावा,<br>३. वयाचा पुरावा,<br>४. विवाहासाठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र,<br>५. ९० दिवसांनंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा उतारा देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ६ | (अ) दस्तऐवजांच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला,<br>३. दस्तऐवजाची प्रत (खरेदी खत / बक्षीसपत्र / वाटणीपत्र व इतर). | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| | (ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला,<br>३. वारसा हक्क प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. ७/१२, सिटी सर्व्हे उतारा,<br>३. मोजणी नकाशा / सिटी सर्व्हे नकाशा. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | भाग नकाशा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. ७/१२, सिटी सर्व्हे उतारा,<br>३. मोजणी नकाशा / सिटी सर्व्हे नकाशा. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवाना देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. वास्तूविशारदाचा दाखला,<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे,<br>४. बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती,<br>५. मोजणी नकाशा,<br>६. मंजूर रेखांकनाची प्रत. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ६० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १० | जोते प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ११ | भोगवटदार प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र.<br>३. जोते प्रमाणपत्र,<br>४. घरमालक / वास्तूविशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १२ | नळजोडणी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. जागामालकी कागदपत्रे,<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १३ | जलनिस्सारण जोडणी देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. जागामालकी कागदपत्रे,<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १४ | नव्याने कर आकारणी. | १. विहित नमुन्यातील अर्ज,<br>२. भोगवटा प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १५ | पुन: कर आकारणी | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १६ | मालमत्ता कराची मागणी पत्र तयार करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | कर माफी मिळणे | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ७ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १८ | रहिवास नसलेल्या मालमत्तांना करात सूट मिळणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| १९ | स्वयंमूल्यांकन (मालमत्ता कर). | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २० | आक्षेप नोंदविणे | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २१ | उपविभागामध्ये मालमत्ता विभाजन (मालमत्ता कर). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला, ३. मालकी हक्काची कागदपत्रे / खरेदीखत, वाटणीपत्र, बक्षीसपत्र इत्यादी). | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २२ | मालमत्ता पाडणे व पुन:बांधणी आकारणी (मालमत्ता कर). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | कर निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २३ | नळजोडणी मालकी हक्कात बदल करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला, ३. मालकी हक्काची कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ७ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २४ | नळजोडणी आकारामध्ये बदल करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला, | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २५ | तात्पुरते / कायम-स्वरूपी नळजोडणी खंडित करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ७ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २६ | पुन:जोडणी करणे (पाणीपुरवठा). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | वापरामध्ये बदल करणे. (पाणीपुरवठा). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २८ | पाणी देयक तयार करणे (पाणीपुरवठा). | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| २९ | प्लंबर परवाना (पाणीपुरवठा). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३० | प्लंबर परवाना नूतनीकरण करणे (पाणीपुरवठा). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र, ३. थकबाकी नसल्याचा दाखला. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३१ | थकबाकी नसल्याचा दाखला (पाणीपुरवठा). | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३२ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे (पाणीपुरवठा) | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ७ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३३ | अनधिकृत नळजोडणी तक्रार करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ७ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३४ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३५ | पाण्याची गुणवत्ता तक्रार करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३ दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३६ | व्यापार / व्यवसाय / साठा करणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ७ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३७ | मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज,<br>२. रस्ता पुन:स्थापन करार. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ७ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३८ | नवीन परवाना मिळणे (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज,<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ३९ | परवान्याचे नूतनीकरण करणे (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज,<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | कर निरीक्षक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४० | परवाना हस्तांतरण (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज,<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४१ | परवाना दुय्यम प्रत (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज,<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४२ | व्यवसायाचे नाव बदलणे (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज,<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४३ | व्यवसाय बदलणे (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज,<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४४ | परवाना / भागीदाराचे नाव बदलणे (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज,<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४५ | भागीदारांच्या संख्येत बदल (वाढ / कमी) (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४६ | परवाना रद्द करणे (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४७ | कालबाह्य परवानासाठी नूतनीकरण सूचना (व्यवसाय). | १. योग्यप्रकारे भरलेले अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | वरिष्ठ लिपिक (संबंधित विभाग प्रमुख) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४८ | नवीन जाहिरात / आकाशचिन्ह परवाना, (Signange License) नवीन परवाना नूतनीकरण. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस. | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ४९ | सिनेमा चित्रीकरण परवाना (Movie (Shooting License) नवीन परवाना व नूतनीकरण. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस. | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ५० | व्यवसाय परवाना स्वयंनूतनीकरण (Auto Renewal of Trade License). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस. | संबंधित विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ५१ | मोबाईल टॉवर परवाना / Mobile Tower Approval (Ground Base Tower and Roof Top Tower). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना, ३. संबंधित इमारतीच्या मालकीहक्काचा पुरावा, ४. वैध भाडेकरारनामा, ५. स्थळाचा नकाशा (१:१०००), ६. ज्या इमारतीवर टॉवर उभारायचा आहे त्याचे वैध भोगवटा प्रमाणपत्र, ७. संबंधित इमारतीच्या / जमिनीच्या मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र, ८. सक्षम प्राधिकाऱ्याचा अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र, ९. सक्षम प्राधिकाऱ्याचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र, १०. पर्यावरण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र. ११. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र. १२. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने / दस्ताऐवज. | शासनाने विहित केलेले व नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ६० दिवस. | बांधकाम अभियंता | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५२ | रस्ता खोदाई परवाना देणे / To Grant Road Cutting Permission नवीन परवाना व नूतनीकरण. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. ३. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस. | नगर अभियंता (स्थापत्य) | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ५३ | राज्य खाद्य परवान्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना-हरकत दाखला. To Issue NOC from Municipality or other Local Body for State License for Food Business. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. ३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्का-बाबतची कागदपत्रे. ४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ५४ | खाद्य नोंदणी प्रमाण-पत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरोग्यविषयक ना-हरकत प्रमाणपत्र देणे. / To Issue Health NOC by Municipality / Panchayat for Food Registration Certificate. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. ३. ज्या इमारतीत सदर आस्थापना / कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्का-बाबतची कागदपत्रे. ४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ५५ | पाणी उपसा करण्या-साठी केंद्रीय भूजल सर्वेक्षण विभाग (अथवा इतर संबंधित विभाग) यांचे ना-हरकत प्रमाणपत्राकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे. / To Issue | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र. ३. ना-हरकत प्रमाणपत्र दिल्या-नंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणेबाबतचे व पर्जन्य जल पुनर्भरण करणेबाबतचे प्रतिज्ञापत्र, ४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | पाणीपुरवठा अभियंता (संबंधित विभाग प्रमुख) | | |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Certificate of non-availability of water from water supply agency required for NOC for water abstraction from Cetral Ground Water Authority / Relevant Authority). | | | | | | |
| ५६ | लॉजिंग हाउस परवाना देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | संबंधित विभागाचे विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५७ | लॉजिंग हाउस परवान्याचे नूतनीकरण करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | संबंधित विभागाचे विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५८ | मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवाना देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | संबंधित विभागाचे विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५९ | मंगल कार्यालय / सभागृह वगैरे परवान्याचे नूतनीकरण करणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ३० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | संबंधित विभागाचे विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६० | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १५ दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | संबंधित विभागाचे विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |

**परिशिष्ट**--*चालू*

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६१ | भूमिगत दूरसंचार वाहिनी (ऑप्टिकल फायबर केबल) टाकण्याकरिता परवानगी देणे. / Permission for Establishment of underground Cable infrastructure (Optical Fiber Cable). | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. नगर विकास, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/सीआर-२४२/UD-२०, दि. १९ डिसेंबर २०२२ मधील Schedule III नुसार आवश्यक कागदपत्रे. ३. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ६० दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्ह्याचे जिल्हा सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | संबंधित विभागाचे विभागीय सहआयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६२ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदी-नुसार वृक्षतोड परवानगी देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज, २. शासन वेळोवेळी विहित करेल अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ४५ दिवस | संबंधित प्राधिकरणाचे वृक्ष अधिकारी | संबंधित नियोजन प्राधिकरणाचे मुख्याधिकारी | संबंधित नियोजन प्राधिकरणा-कडील वृक्ष प्राधिकरण |
| ६३ | रस्त्यावरील खड्डे बुजविणे. | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ५ दिवस | विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ६४ | गटारावरील झाकणे सुस्थितीत ठेवणे. | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | ५ दिवस | विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |
| ६५ | शहरात स्वच्छता ठेवणे. | १. पुराव्यासह अर्ज उदा. Geo Tag केलेले फोटो इत्यादी. | नगरपंचायत स्तरावर निश्चित केलेले दर. | १ दिवस | विभाग प्रमुख | कार्यालय अधीक्षक | मुख्याधिकारी |

**पराग कोडगुले,**
मुख्याधिकारी,
मेढा नगरपंचायत, मेढा.

मेढा, २० जानेवारी २०२५.

---

**वडूज नगरपंचायत, वडूज**

**अधिसूचना**

क्रमांक व.न.पं./१९०९/२०२५.— महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत राज्यातील खालील लोकसेवा या राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायती यांनी अधिसूचित करणेबाबत नगर विकास विभाग-२ यांच्यामार्फत शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार यांचेद्वारे राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवांची यादी पुढीलप्रमाणे आहे.